**ठळक बातम्या**

- नव्या उपराष्ट्रपतींच्या निवडीसाठी निवडणूक आयोगाकडून प्रक्रीया सुरु
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज ब्रिटन आणि मालदीव दौऱ्यावर रवाना
- सीमापार दहशतवादाला मदत पुरवणाऱ्या देशांना दंड ठोठावण्याची भारताची संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत मागणी

**आणि**

- ज्येष्ठ रंगकर्मी, आणि राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे माजी संचालक रतन थिय्याम यांचं निधन

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यानंतर नव्या उपराष्ट्रपतींच्या निवडीसाठी भारत निवडणूक आयोगानं निवडणुक प्रक्रियेला सुरुवात केली आहे. याअंतर्गत घोषणेपूर्वीच्या तयारीचा भाग म्हणून राज्यसभा आणि लोकसभेतील नामनिर्देशित सदस्यांचा समावेश असलेल्या मतदार संघांची तयारी, निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निवडीला अंतिम स्वरुप देणं तसंच यापूर्वीच्या सर्व उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकांशी संबंधित दस्तऐवज तयार करून ते प्रसारित करण्याची कामं सुरु केली असल्याचं आयोगानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. या तयारीच्या टप्प्यांनंतर, लवकरच उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची अधिकृत तारीख घोषित केली जाईल, असं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज ब्रिटन आणि मालदीवच्या दौऱ्यावर रवाना झाले. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर

यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा करणार आहेत; तसंच ब्रिटनचे राजे चार्ल्स यांचीही ते भेट घेतील, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिस्री यांनी काल नवी दिल्लीत बातमीदारांना सांगितलं. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी मालदीवच्या दौऱ्यावर जाणार आहेत. २६ जुलैला मालदीवच्या ६०व्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित राहणार आहेत. या भेटीत प्रधानमंत्री मोदी मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईज्जु यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत, असं मिस्री यांनी सांगितलं.

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्षांनी विविध मुद्द्यांवरून केलेल्या घोषणाबाजीनंतर दोन्ही सभागृहांचं कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब झालं. लोकसभेत आज प्रश्नोत्तराचा तास सुरू झाल्यानंतर बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरिक्षण विषयावर चर्चेची मागणी विरोधी पक्षांनी केली. मात्र सभापतींनी आता प्रश्नोत्तराचा तास होणार असून चर्चा विहित नियमानुसार होईल, असं सांगितलं. त्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे सभापतींनी सभागृहाचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दोन वाजेपर्यंत तहकूब केलं.

राज्यसभेतही विरोधी पक्षांनी बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरिक्षण विषयावर चर्चेची मागणी करत घोषणाबाजी केली. या विषयावर शून्य प्रहरात चर्चा करण्याचं आवाहन उपाध्यक्ष हरिवंश यांनी केलं. मात्र विरोधकांनी घोषणाबाजी सुरू ठेवली. त्यामुळे उपाध्यक्षांनी सभागृहाचं कामकाज आधी बारा आणि नंतर दोन वाजेपर्यंत तहकूब केलं.

**<><><><><>**

बिहारमधल्या रेल्वे प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पात केलेली तरतूद गेल्या अकरा वर्षात नऊ पटीने वाढल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. अकरा वर्षापूर्वी बिहारला रेल्वेसाठी केवळ एक

हजार १३२ कोटी रुपये मिळाले होते. ती तरतूद आता १० हजार कोटींपर्यंत वाढली आहे. अनेक वर्षांपासून रखडलेले प्रकल्प पूर्ण झाले आहेत. ९८ स्थानकांच्या पुनर्विकासाचं काम सुरू आहे, आठ वंदे भारत आणि पाच अमृत भारत गाड्या बिहारमधे सुरू आहेत, असंही वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आज राष्ट्रीय प्रसारण दिन आहे. आकाशवाणीचा वर्धापन दिन. ऐकूया त्याविषयीची माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड- व्हॉईस कास्ट- रश्मी पाटकर**

*श्रोतेहो, २३ जुलै १९२७ या दिवशी, देशातलं पहिलं नभोवाणी प्रसारण मुंबई केंद्रावरून इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनीच्या अंतर्गत सुरू झालं. ८ जून १९३६ रोजी, भारतीय सार्वजनिक प्रसारण सेवा ऑल इंडिया रेडिओ  मध्ये रुपांतरित झाली. ऑगस्ट १९३७ मध्ये केंद्रीय वृत्तसंस्था अस्तित्वात आली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५६ मध्ये आकाशवाणी हे नाव ऑल इंडिया रेडियोसाठी स्वीकारण्यात आलं. १९५७ मध्ये विविध भारती ही जाहिरात प्रसारण सेवा सुरू झाली.*

*१५ एप्रिल १९५४ पासून आकाशवाणी मुंबईचा प्रादेशिक वृत्त विभाग श्रोत्यांच्या सेवेत आहे. विश्वासार्ह आणि ताज्या बातम्या हे आकाशवाणीच्या बातमीपत्रांचं वैशिष्ट्य आहे. रेडिओ हा देशवासियांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग असून  बहुजन हिताय, बहुजन सुखाय या आपल्या ब्रीदवाक्यानुसार  आकाशवाणी  ज्ञान, माहिती आणि  मनोरंजनाची भूक भागवण्याचं  करण्याचं कार्य करत आहे. देशवासियांसाठी महत्त्वाच्या घोषणा, तसंच उच्चपदस्थांचे संदेश आकाशवाणीवरुन प्रसारित केले जातात. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पदावर आल्यापासून मन की बात या कार्यक्रमाद्वारे दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी आकाशवाणीवरुन देशवासियांशी संवाद साधतात.*

आकाशवाणीच्या वर्धापन दिनानिमित्त ठिकठिकाणच्या आकाशवाणी केंद्रांवर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. आकाशवाणी मुंबई तर्फे नामवंत

गायक आणि कवींचा सहभाग असलेला 'घनु बरसे शब्द स्वरांचा' हा कार्यक्रम आज आकाशवाणी प्रेक्षागृहात सादर होणार आहे.

<><><><><>

सीमापार दहशतवादाला मदत पुरवणाऱ्या देशांना दंड टोठावण्याची मागणी भारतानं संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत केली आहे. भारताचे स्थायी प्रतिनिधी पी हरिश यांनी सुरक्षापरिषदेतर्फे आयोजित चर्चेत ही मागणी मांडली. ऑपरेशन सिंदूर थांबवण्याची विनंती पाकिस्तानच्या लष्कर परिचालन विभागप्रमुखांनी केल्यानंतर ते थांबवण्यात आलं त्यात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी मध्यस्थी केल्याचा दावा हरिश यांनी फेटाळून लावला.

<><><><><>

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची आज जयंती आहे. यानिमित्त विविध ठिकाणी त्यांना अभिवादन करण्यात येत असून विविध उपक्रमांच आयोजन करण्यात आल आहे

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. लोकमान्य टिळकानी देशवासियांच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत चेतवली. ज्ञानाच्या बळावर आणि लोकसेवेवर दृढ विश्वास असलेले ते नेते होते, असं मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

थोर क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतिनिमित्तही प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशातून त्यांना आदरांजली वाहिली आहे. आझाद हे अतुलनीय धैर्य आणि शौर्याचं मूर्तिमंत प्रतीक होते. स्वातंत्र्यलढ्यातली त्यांची भूमिका सदैव प्रेरणादायी आहे, असं प्रधानमंत्री आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

<><><><><>

ज्येष्ठ रंगकर्मी रतन थिय्याम यांचं आज दीर्घ आजाराने निधन झालं. ते ७७ वर्षांचे होते. मणिपूरमधे राहणारे थिय्याम इम्फाळ मधल्या रुग्णालयात गेले काही दिवस उपचार घेत होते. उपचारांदरम्यान आज पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली.

नाटककार, दिग्दर्शक आणि रंगमंचाला दिवाणखान्यातून बाहेर काढून मोकळ्यावर नेणाऱ्या थिएटर ऑफ रूट्स नाट्यचळवळीचे जनक म्हणून थिय्याम यांची ओळख होती. भरतमुनींच्या नाट्यशास्त्राचा त्यांच्यावर प्रभाव होता. तांग ता या युद्धकलेचा आविष्कारही त्यांनी संस्कृत नाटककार भासाच्या उरुभंगम या महाभारत कथेवर आधारित नाटकाच्या सादरीकरणात केला. चक्रव्यूह या नाटकासाठी त्यांना १९८७च्या एडिनबर्ग आंतरराष्ट्रीय महोत्सवात फ्रिंज फर्स्ट पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. सम्राट अशोकाच्या जीवनावरचं ‘उत्तर प्रियदर्शी’ हे त्यांचं नाटक आंतरराष्ट्रीय स्तरावरही गाजलं.

रतन थिय्याम यांनी राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे संचालक, तसंच, संगीत नाटक अकादमीचे अध्यक्ष म्हणूनही काम केलं. संगीत नाटक अकादमी पुरस्कार, कालिदास सन्मान असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. केंद्र सरकारने त्यांच्या रंगभूमीवरच्या कार्याची दखल घेऊन त्यांना १९८९मध्ये पद्मश्री सन्मान प्रदान केला होता.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड दरम्यान पाच कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला चौथा सामना आज मँचेस्टरमधे ओल्ड ट्रॅफर्ड इथं होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता सुरू होईल. या मालिकेत भारत १-२ नं पिछाडीवर आहे.

**<><><><><>**

तीन सामन्यांच्या महिला एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेतल्या शेवटच्या सामन्यात काल भारतानं इंग्लंडचा १३ धावांनी पराभव केला आणि

मालिका २-१ अशी जिंकली. भारतीय संघानं दमदार फलंदाजी करत, निर्धारित ५० षटकांत ५ बाद ३१८ धावा केल्या आणि यजमान इंग्लंडसाठी ३१९ धावांचं लक्ष्य ठेवलं. भारताची कर्णधार हरमनप्रीतने ८४ चेंडूत १०२ धावा केल्या. इंग्लंडच्या संघाला ४९ षटकं आणि पाच चेंडूत ३०५ धावा करता आल्या. भारताच्या क्रांती गौडनं सहा बळी घेतले. हरमनप्रीतच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिला सामन्यातली  आणि मालिकेतली सर्वोत्कृष्ट खेळाडूचा सन्मान मिळाला.

**<><><><><>**

महागडं फर्निचर असल्याचं भासवून ३० कोटी रुपयांच्या सीमाशुल्काची अफरातफर करणारं जाळं डीआरआय अर्थात महसूल गुप्तचर संचालनालयाने उघडकीला आणलं आहे. डीआरआयला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर डीआरआयने विविध ठिकाणी केलेल्या छापेमारीत हा घोटाळा उघड झाला.

**//<><><><><>//**